**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**सायबर गुन्हे कक्ष**
३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर –०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :-२२१/२०२२ दिनांक :- २५/०७/२०२२

# इलेक्ट्रीक बिल अपडेट करण्यासाठी OTP प्राप्त करुन १,२०,०५८ रुपयाची फसवणूक रक्कम परत मिळविण्यात सायबर गुन्हे कक्षास यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत वसई पोलीस ठाणेचे हद्दीत राहणाऱ्या महिला नामे सौ.जैसवाल रा. भुईगाव,वसई (पश्चिम) ता.वसई, जि.पालघर यांना दिनांक १६/०७/२०२२ रोजी ९८३६०७७१२ यावरुन फोन करुन *"तुमचे इलेक्ट्रीक बिल अपटेड करण्याकरीता तुम्हाला ओ.टी.पी. आला आहे तो दया."* असे सांगून तक्रारदार यांचे बँक खात्यावरील १,४९,९९०/- रुपये रक्कम काढून घेण्यात आलेबाबत तक्रार सायबर गुन्हे कक्ष येथे प्राप्त झालेली होती.

**(सायबर गुन्हे कक्ष आवक अर्ज क्रमांक १०८३-बी/२०२२ दिनांक १६/०७/२०२२ अन्वये चौकशीकामी प्राप्त झाला.)**

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत त्यांचे बँकेकडून माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांचे फसवणूक मोबिक्विक, पेयु पेमेंट, एअरटेल पेमेंट बँक/रोझरपे,ईप्पोपे, ॲपेक्स पे, एअरोनपे अशा वेगवेगळया पेमेंट गेटवेद्वारे पूढे वळती करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले. नमूद पेमेंट गेटवे कंपन्यासोबत पत्रव्यवहार व पाठपूरावा करुन नमूद फसवणूक रक्कम थांबविण्यात आली. तसेच फसवणूक रक्कम १,२०,०५८/- रुपये पुन्हा तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **अशा प्रकारे फसव्या कॉलला उत्तर देवू नका.**
- **कॉल आलेल्या व्यक्तीकडे आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करु नये.**
- **कोणत्याही अनोळखी कॉल आल्यास त्याची विश्वासर्हता पडताळणी करुन घ्यावी.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असे कृत्य कोणी करीत असल्याचे आढळुन आल्यास तात्काळ तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) अति.कार्य.पोलीस उप आयुक्त गुन्हे, श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, पोलीस अंमलदार /१२०९५ गणेश इलग, पोलीस अंमलदार/१२०९२ प्रविण आव्हाड, महीला पोलीस अंमलदार/ १३०८७ अमिना पठाण यांनी पार पाडली आहे.

सायबर गुन्हे शाखा संपर्क क्रमांक :- ०२२-२८११ ०१३५
सायबर गुन्हे शाखा व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५
सायबर गुन्हे शाखा ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

**----0000----**